Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 797 – 800
DOI: 10.5281/zenodo.10279970

Original Research Article

# महात्मा गांधीजींचे सत्याग्रह विषयक विचार

प्रा. डॉ. सुचिता निवृत्तीराव किडीले

इतिहास विभाग. मा. दी. मं. महाविद्यालय, औराद शहाजानी ता. निलंगा ४१३५२२ लातूर महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: suchitakidilemdm@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 27 October, 2023 | Published: 28 October, 2023

'सत्याग्रह' ही संकल्पना महात्मा गांधीजींनी जगाला दिलेली फार मोठी अशी देणगी आहे. त्यांच्या मते सत्याग्रह ही प्रत्यक्ष कृतीचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. इतर सर्व मार्ग संपल्यानंतर या मार्गाचा अवलंब करावा. सत्याग्रह या चळवळीला धर्माचे अधिष्ठान आहे. सत्याग्रहाचे वर्णन गांधीजींनी शांततामय बंद असे केले आहे. सत्य व अहिंसेच्या सहाय्याने दृष्ट प्रवृत्तीशी मुकाबला करणे म्हणजे सत्याग्रह होय. प्रस्थापित कायद्याचा उघडपणे किंवा सामुदायिक रित्या भंग करणे हे त्यांच्या कार्यक्रमाचे प्रमुख अंग होते.सत्याग्रहाचे पहिले तत्त्व म्हणजे स्वतःचा शोध घेताना शत्रूशी हिंसेने वागू नये, तर सहानुभूतीपूर्वक त्याला चुका पासून परावृत करावे.सत्य व व अहिंसा या दोन्ही तत्त्वांचा मिलाप म्हणजे सत्याग्रह होय.

सत्याग्रह हा संस्कृत शब्द आहे. हा शब्द सत्य आणि आग्रह या दोन शब्दापासून बनला आहे. म्हणून सत्याग्रहाचा शब्दशः अर्थ सत्याचा आग्रह असा आहे महात्मा गांधींनी सत्याला चिटकून राहणे म्हणजे सत्याग्रह अशी सत्याग्रहाची व्याख्या सांगितली आहे. "Satyagraha is relentless search for truth and determination to reach truth." गांधीजींच्या मते सत्याग्रह म्हणजे सत्य बळ (Truth force) व प्रेम बळ (Love force) वा नीतीबळ (Moral force) होय. म्हणजेच त्यांच्या मते सत्याग्रह म्हणजे आत्मिक शक्तीच्या जोरावर अन्याय बापू मिरवणुकीच्या विरोधात केलेला प्रतिकार व प्रत्यक्ष कृती होय स्वतः कष्ट सहन करून सत्याचे रक्षण करणे म्हणजे सत्याग्रह गांधीजी लिहितात "Satyagraha and it's of shoots, non-co-operation and nothing but new names for the low of suffering." सत्याग्रह म्हणजे चुकीचा कायदा मोडणे होय.

गांधीजींनी चळवळीला योग्य नाव सुचवण्यासाठी त्यांनी पुरस्काराची घोषणा करून आपल्या 'इंडियन ओपिनियन' मधून वाचकांना आवाहन केले होते. अनेक वाचकांनी नावे सुचवली होती. यापैकी फिनिक्सवासी साथी मगनलाल गांधी यांनी सुचवलेले 'सद्याग्रह 'हे नाव त्यांच्या पसंती उतरले होते. मात्र याला अधिक संक्षिप्त आणि अर्थपूर्ण करण्यासाठी त्यांनी 'सदयाग्रह' ऐवजी सत्य आग्रह असे शब्द योजले आणि मग सत्याग्रहाचे स्वरूप समजावून सांगण्यासाठी अधून मधून नाना लेख लिहित राहिले. दक्षिण आफ्रिकेतील हिंद जणांच्या चळवळीतील जनतेने या शब्दाला सहज झेलून घेतले. आणि देश व जगात हा शब्द इतका स्वीकृत झाला की, आज तर हा शब्द अनेक भाषांच्या शब्दकोशामधूनही प्रविष्ट झाला आहे.

सत्याला धरून चलणे किंवा सत्याचा आग्रह धरणे आणि अन्यायाविरुद्ध शांततेच्या मार्गाने प्रतिकार करण्याचा एक अहिंसक प्रयत्न म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रह यामध्ये प्रतिकारासाठी संयम व सहनशीलतेची अत्यंत आवश्यकता असते. अन्याय करणाऱ्या व्यक्तीला सत्य व न्याय याची जाणीव करून देणे व त्या व्यक्तीचे मतपरिवर्तन करणे हे सत्याग्रहाचे उद्दिष्ट असते. अहिंसेमुळे प्रतिपक्षातील लोकांचे हृदय परिवर्तन होते प्रतिपक्षावर दडपण आणण्यापेक्षा त्यांचे मत परिवर्तन करणे हा सत्याग्रहाचा मुख्य उद्देश असतो.

सत्याग्रह करणाऱ्या व्यक्तीने हिंसा व असत्य याचा वापर करता कामा नये.सत्याग्रहाचा हा मार्ग सामान्य माणसालाही अनुसरता येतो. महात्मा गांधींनी भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी जनतेला सत्याग्रहाच्या मार्गाने आंदोलन करण्यासाठी प्रेरित केले. स्वतः त्याचे नेतृत्व केले. तसेच भारतात यांनीच पहिल्यांदा सत्याग्रहाचा प्रयोग केल्याचे दिसते.

सत्याग्रह या शब्दाचा मुळात जन्म झाला, तो 22 ऑगस्ट 1906 रोजी ट्रान्सवाल सरकारच्या गॅझेट मध्ये कायदेमंडळात समाविष्ट होणाऱ्या बिलचा मसुदा वाचल्यानंतर त्या बिलचे गांभीर्य सर्वांच्या लक्षात गांधीजींनी आणून दिले तेव्हा सर्वांनी ठराव केला की जाहीर सभा भरवावी. 11 सप्टेंबर 1906 रोजी सभा भरली. सभेत ठराव मांडले गेले .त्यात एक चौथाच ठराव महत्वाचा होता. त्यांचा सारांश असा होता की या बिलाला विरुध सर्व उपाय आजमावून सुद्धा जर ते पास झाले तर हिंदीलोकांनी त्याला शरण जायचे नाही. शरणं न गेल्यामुळे जी जी दुःखे येतील ती सर्व सहन करायची.या चळवळीला काय नाव देता येईल हे कोणाला कळत नव्हते. मगनलाल गांधींनी 'सद्याग्रह' हे नाव सुचविले.कारण हा आग्रह 'सद' म्हणजे शुभ' आहे. गांधीजींना ते नाव पसंत पडले तरी त्या नावात ज्याचा अंतर्भाव व्हावा असे वाटत होते तेच नव्हते म्हणून गांधींनी 'द' चा 'त 'करून त्याला 'य' जोडला व 'सत्याग्रह' नाव बनविले. सत्यामध्ये शांतीचा समावेश होतो असे मानून कोणत्याही वस्तूचा आग्रह धरल्याने त्यातून बळ उत्पन्न होते म्हणून आग्रहात बळाचा अंतर्भाव केला व हिंदी चळवळीला सत्याग्रह म्हणजे सत्य आणि शांती यामधून निपजणाऱ्या बलाचे नाव देऊन ते प्रसिद्ध करण्याला सुरुवात केली.

महात्मा गांधी यांच्या मते सत्याग्रहीच्या अंगी पुढील गुण असले पाहिजेत. सत्याग्रही ही निस्वार्थी असावी.ब्रह्मचर्याचे पालन करावे. स्वदेशी वस्तूचा वापर करावा.सत्य व अहिंसा यावर श्रद्धा असावी. शिस्तीचे पालन

करावे. त्यागाची भावना असावी. विरोधकावर विश्वास व प्रेम ठेवावे. संयम ढळू देता कामा नये. कधीही निराश होऊ नये. मादक पदार्थाचे सेवन करू नये असे गांधीजी सतत सांगत.

सत्याग्रह करत असताना महात्मा गांधींनी काही मार्ग सांगितले आहेत. असहकार, कायदेभंग, स्वदेशी, हरताळ, बहिष्कार, उपोषणे या मार्गाने जर सत्याग्रह जनतेने केले तर यश नक्की प्राप्त होईल.

सत्याग्रहाबाबत गांधीजींचे विचार खूपच वेगळे होते. सत्याग्रह सत्य व अहींसेवर आधारलेला असावा. त्यात कोणत्याही हिंसेचा थारा नाही. जे चूक व असत्य आहे त्यासमोर कधीही झुकता कामा नये.खोट्याविरुध लढा देताना मिळणाऱ्या यातनांची खऱ्या सत्याग्रही याने तरारी ठेवली पाहिजे.यातना या सत्त्याबद्दल असणाऱ्या प्रेमाचा एक भाग आहे. खऱ्या सत्याग्रहीने अन्याय करणाऱ्या, देणाऱ्या व्यक्तीबद्दलही प्रेमभावना व्यक्त केली पाहिजे. सत्याग्रहीने परिणामाची भीती न बाळगता लढा दिला पाहिजे. व दृष्ट प्रवृत्ती विरुध्द मान झुकवली नाही पाहिजे. शुर व सामर्थ्यवानच सत्याग्रह करू शकतात. दुर्बल लोकांचे ते काम नव्हे. भेकडपणापेक्षा हिंसा बरी असे गांधीजी सतत म्हणत.

महात्मा गांधींनी आपले तत्व आणि व्यवहार यांच्याशी कधीच तडजोड केली नाही. विचार आणि कृती या गोष्टी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असा त्यांचा समज होता. सत्य व अहिंसा हा त्यांचा जीवनाचा भाग होता.

सत्याग्रहाच्या स्वरूपाला समग्रतेने समग्रतेने प्रकट करून शकतील असे तीन पर्यायी शब्द गांधीजींनी आरंभिक काळातच वापरले होते. काळानंतर ते अधिकाधिक स्पष्ट होत गेले. हे तीन शब्द सत्यशक्ती, प्रेमशक्ती आणि आत्मशक्ती. सत्याग्रहाचे दर्शन काही निष्प्राण, निर्बळ व निष्क्रिय स्वरूपाचे नव्हते. ते एका सक्रिय परिवर्तन कारी ताकदीला अभिव्यक्त करणारे तत्त्वज्ञान होते. सत्यशक्ती समग्र अस्तित्वाच्या शक्तीला सुचित करते. सत्यावर आधारित न्याय, स्वातंत्र्य, समता, विशुद्ध आचरण यासारखी मुल्ये या चळवळीला शक्ती पुरवतात असे हा शब्द व्यक्त करत होता. या जगात जी काही आधिभोतिक वा आध्यात्मिक शक्ती आहे. ती सारी सत म्हणजे अस्तित्वाचा गथीच निहीत आहे असं असतं वा मिथ्याच्या ठायी नाही. असाही भाव हा शब्द सुचवत होता. सत्याग्रह चळवळीचे साधन सुचवणारा शब्द आहे प्रेमशक्ती, सत्याग्रह कुठल्या प्रकारे आणि कुठल्या ताकदीच्या जोरावर काम करू इच्छितो ते या शब्दातून स्पष्टपणे व्यक्त होतो. सत्याग्रहाचा तिसरा पर्याय शब्द आहे आत्मशक्ती यातून सत्याग्रहामध्ये तत्त्वज्ञान सुचित होते. आत्म्याच्या एकतेत व अखडतेत अतुल विश्वास असे हे तत्त्वज्ञान आहे.सत्याग्रहाची विविध रूपे या रूपाचे नाना विचार विविध तत्त्वज्ञाने या पर्यायी शब्दाच्या माध्यमातून बीज रूपाने यांच्या समग्र रूपाला प्रगट केले जात होते.

1906 ते 1948 या काळात प्रचलित असणारे विविध सत्याग्रह सत्य,प्रेम आणि आत्म्याच्या शक्तीची प्रकट रुपेच होती. तिन्ही प्रकारच्या शक्ती त्यांच्या अनेक सत्याग्रहाच्या माध्यमातून प्रकटलेल्या दिसतात. गांधींच्या नेतृत्वाखाली चार दशकावूनही अधिक काळपर्यंत चाललेल्या विविध सत्याग्रहाच्या माध्यमातून सत्याग्रही तत्त्वज्ञानाच्या विविध रूपांना केले जात होते.

सारांश रुपाने आपल्याला असे म्हणता येईल की महात्मा गांधीजीं भारतात आल्यानंतर स्वातंत्र्य युद्धाचे नेतृत्व केले. तीन दशके चाललेल्या या युद्धादरम्यान त्यांनी कुशल व्यूहरचना केली होती. स्थळ काळाच्या बदलत्या परिस्थितीनुसार वेगवेगळया प्रसंगी त्यांनी विविध सत्याग्रही प्रकारांच्या अवलंब केला होता. ज्या सत्याग्रहांमध्ये त्यांचां प्रत्यक्ष सहभाग नव्हता अशा सत्याग्रहाबाबत ही त्यांनी सूत्रसंचालकाच्या भूमिकेतून मार्गदर्शकाची भूमिका पार पाडली होती. 'नवजीवन' 'हरिजन' वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी दर आठवड्याला सूक्ष्म आणि तपशीलवार मार्ग दर्शविला होता. अशा प्रकारे सत्याग्रहाच्या शास्त्राच्या विकास होत गेला होता. आणि एक नेता म्हणून सत्याग्रहाच्या प्रयोगाविषयी असाधारण स्वरूपाचे कला कौशल्य त्यांनी प्रदर्शित केले होते.

**संदर्भ सूची**

१. मोहनदास करमचंद गांधी (संक्षिप्तकार) भारतन कुमारप्पा 'संक्षिप्त आत्मकथा' नवजीवन प्रकाशन-मंदिर अहमदाबाद प्रथम आवृत्ती डिसेंबर 2006

२. वनमाला परीख अनुवाद काशिनाथ त्रिवेदी 'हमारी बा' नवजीवन प्रकाशन अहमदाबाद पांचवा पुनर्मुद्रण 2011

३. प्यारेलाल -अखेरचं पर्व- महात्मा गांधी–पराग एजन्सी अकोला.खंड एक ते चार आवृत्ती 2004

४. कृष्ण कृपालानी संग्रह आणि संपादक, अनुवादक -ब्रिजमोहन हेडा 'गांधीजींचे जीवन त्यांच्या शब्दात'नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद ग्यारहवाँ पुनर्मुद्रण जून 2013

५. नारायणभाई देसाई 'सत्याग्रही बापू' रिसर्चटीम गांधी रिसर्च फाउंण्डेशन आवृत्ती 2021

६. उपाध्याय हरिभाऊ 'बापू कथा' 1920-1948- सर्व सेवा संघ-प्रकाशन - राजघाट वाराणसी जून 2003

७. बोह्राडे मच्छिंद्र-' महात्मा गांधी आणि जीवन शिक्षण' मराठी अभ्यास केंद्र – मुंबई 2021

८. मोहनदास करमचंद गांधी 'माझे सत्याचे प्रयोग' अथवा 'आत्मकथन' रिया पब्लिकेशन कोल्हापूर. जानेवारी 2013